**राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - इबीसी-२००९/प्र.क्र.१४६/मावक-२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ जुलै, २००९.

वाचा : शासन निर्णय क्रमांक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक - इबीसी-२००५/ प्र.क्र. २१३ /मावक-२, दिनांक : २७ मार्च,२००८.

<u>प्रस्तावना</u>- शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २००६-०७ मध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ९ फेब्रुवारी २००७ अन्वये घेतला. तसेच सन २००७-०८ व सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे शासन निर्णय दिनांक २७ मार्च, २००८ व दिनांक १७ जुलै, २००८ अन्वये सदर योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजना सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात पुढे चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय - राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (बी.एड. व डी.एड.कोर्स वगळून) सन २००९-१० या वर्षी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यास खालील अटींवर शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर योजना सन २००६-२००७, सन २००७-२००८ व सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात खालील व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीपर्यंत व सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना त्या वर्षापुरती लागू राहील.

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग )

..२/-

ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माण शास्त्र | औषधनिर्माण शास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | आर्कीटेक्चर | -- |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान)

ड) इ.१० वी ची शालांत परिक्षा (S.S.C./C.B.S.E. व तत्सम) उत्तीर्ण होऊन महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या पूर्णवेळ अभ्यासक्रमात (Full Time Course) शिकणा-या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सदर योजना अनुज्ञेय राहील.

३. या योजनेचा लाभ विनाअनुदानित तसेच कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खाली नमूद केलेल्या अभ्यासक्रमांसाठी पुढील अटी व शर्थींच्या आधीन राहून देण्यात येईल.

अ) <u>अभियांत्रिकी अभ्यासक्रम</u> - शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (CET) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहिल. (सदर योजनेचा लाभ संस्थास्तरावर करण्यात येत असलेल्या (Institutional level quota) परिक्षेद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही)

ब) <u>आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम</u> - शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (CET) प्रवेश घेतलेल्या तसेच खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांच्या वतीने तसेच असोसिएशन मार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (Associate CET) आणि इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यासक्रमांसाठी (उदा.नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील. एकूण प्रवेश क्षमतेच्या १५ % जागा अनिवासी भारतीयांकरीता राखून ठेवल्या जातात. सदर व्यवस्थापन कोट्यामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांस तसेच अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ कोणत्याही परिस्थितीत अनुज्ञेय राहणार नाही.

क) <u>कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय अभ्यासक्रम</u> - काही अभ्यासक्रमासाठी शासनाची सामायिक परिक्षा (CET) घेण्यात येत नाही. त्यावेळी इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारावर अशा अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

४. आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठीसुद्धा सदरची योजना लागू राहील.

..३/-

५. सदर योजनेचा लाभ घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना जातीच्या वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता राहील.

६. ही योजना अनिवासी भारतीयांकरीता (NRI) कोट्यातून व्यवस्थापनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रवेशार्थींस व अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सवलत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू रहाणार नाही. परंतु एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात ए.टी.के.टी.द्वारे प्रवेश घेतलेल्या [Allowed To Keep Term (A.T.K.T.) मिळालेल्या] विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

७. यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक - एन ३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना-(विघयो) (०४) (२०) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने, (२२२५ ३८० ५), ३४ शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने " या लेखाशीर्षाखाली सन २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २००९०७२७१३०९५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( किशोर गजभिये )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री, सा.न्या. यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री,कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री,सा.न्या.यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई